# "लोकसहभाग व ग्रामविकास"

# विशेष संदर्भ :चंद्रपूर जिल्ह्यातील तालुक्यातील चेक निंबाळा गावातील प्रौढ ग्रामस्थांचे अध्ययन

**डॉ. सुभाष आर. गिरडे (सहयोगी प्राध्यापक)**
एस. आर. एम. कॉलेज ऑफ सोशल वर्क,
पडोली, चंद्रपूर
Mob. No. - 9423961388
Email - girdelic@gmail.com

---

**प्रस्तावना** :

ग्रामविकास आणि लोकसहभाग या दोन्ही संकल्पना ग्रामीण समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी अत्यावश्यक आहेत .ग्रामविकास म्हणजेच ग्रामीण भागातील जीवनाच्या सर्व अंगांचे, म्हणजेच आर्थिक, सामाजिक , सांस्कृतिक आणि पर्यावरणी यक्षेत्रांचे संगोपन व उन्नती. यामध्ये शेतकरी, महिला, युवक आणि वंचित घटकांच्या उन्नती साठी प्रयत्नांचा समावेश होतो. लोकसहभाग म्हणजे ग्रामीण भागातील लोकांचा, त्यांच्या समस्या ओळखून त्यावर उपाय शोधण्यासाठी सक्रिय सहभाग. लोकसहभागामुळे विकासाची प्रक्रिया जास्त प्रभावी होते कारण स्थानिकांच्या गरजा आणि आव्हानांचा सखोल अभ्यास होतो.लोकसहभागामुळे आत्मनिर्भरता वाढते, आणि विकासाच्या प्रक्रियेत जबाबदारीची भावना निर्माण होते. या दोन संकल्पनांच्या एकत्रित प्रयत्नानेच खऱ्या अर्थाने ग्रामीण विकास साध्य होऊ शकतो, जिथे प्रत्येक नागरिकाचा सहभाग असेल आणि सर्वांगीण प्रगती साधली जाईल. ग्रामविकास आणि लोकसहभाग या संकल्पनांचा इतिहास भारताच्या सामाजिक, आर्थिक, आणि राजकीय विकासा शीघ निष्ठपणे जोडलेला आहे. भारतातील ग्रामीण भागात विकास प्रक्रिया सुरु होण्यापूर्वीची स्थिती, स्वातंत्र्योत्तर काळातील विकासाच्या विविध टप्प्यांमध्ये आलेले बदल, आणि या काळात लोकसहभागाच्या संकल्पने चा उदय, याचा आढावा घेणे आवश्यक आहे.

स्वातंत्र्य पूर्वकाळात भारतातील ग्रामीण भागातील जनतेचा विकास आणि कल्याण हा मुद्दा फारसा चर्चेत नव्हता.ब्रिटीश राजवटीत विकासाच्या प्रक्रिया प्रामुख्याने शहरी भागांपुरती मर्यादित होत्या.परंतु,महात्मा गांधी यांनी स्वराज्य आणि स्वावलंबनावर आधारित एक नवीविचारधारा मांडली. गांधीजींचा विश्वास होता की, भारताचा खरा विकास ग्रामीण भागांच्या सर्वांगीन प्रगतीतच आहे. त्यांनी ग्रामस्वराज्याची संकल्पना मांडली, ज्यामध्ये प्रत्येक गावाने स्वतःच्या विकासासाठी स्वतंत्र आणि आत्मनिर्भर असावे, असा आग्रह धरण्यात आला.स्वातंत्र्य मिळाल्यानंतर ग्रामीण भागाचा विकास हा भारतीय राज्यघटनेच्या उद्दिष्टांमध्ये समाविष्ट झाला. पं. जवाहरलाल नेहरू आणि इतरने त्यांनी भारताच्या योजनाबद्ध विकासाची सुरुवात केली.

१९५० च्या दशकात, पंचवर्षीय योजनांच्या माध्यमातून ग्रामीण भागात विकास प्रक्रिया सुरु झाली. १९५२ साली, 'समाजसेवा किंवा' कम्युनिटी डेव्हलपमेंट प्रोग्राम' ची सुरुवात करण्यात आली.या कार्यक्रमाचा उद्देश ग्रामीण

भागातील विकासाला चालना देणे होता. या कार्यक्रमांतर्गत जलसंपत्ती व्यवस्थापन, शेती, शिक्षण, आरोग्य आणि पायाभूत सुविधांचा विकास यासारख्या विविधक्षेत्रांत कामकरण्यात आले.परंतु,सरकारीअधिकारी आणि बाहेरील तज्ज्ञांच्या हस्तक्षेपामुळे आणि स्थानिक लोकांच्या सहभागाच्या अभावामुळे, हा कार्यक्रम अपेक्षित यश मिळवू शकला नाही.

१९८०- ९० च्या दशकात, भारत सरकारने पंचायतीराज संस्थांना अधिक अधिकार देण्याची प्रक्रिया सुरु केली. १९९२ साली ७३ व्या घटना दुरुस्तीद्वारे पंचायतीराज संस्थांना अधिकृतता मिळाली. पंचायतीराज प्रणालीने स्थानिक स्वराज्य संस्थांना अधिक सक्रीय आणि शक्तिशाली बनवले.

लोकसहभागाच्या दृष्टिकोनातून, पंचायतीराज संस्थांनी एक महत्त्वाची भूमिका बजावली.याप्रणालीमुळे ग्रामीण भागातील लोकांना आपले प्रतिनिधी निवडण्याचे आणि विकासाच्या प्रक्रियेत थेट सहभाग घेण्याचे अधिकार मिळाले.पंचायती राज संस्थांद्वारे,स्थानिक समस्या सोडविण्याचे आणि विकासाच्या निर्णयांमध्ये लोकांचा थेट सहभाग वाढला.२००० नंतरच्या काळात,ग्रामविकासाच्या प्रक्रियेत लोकसहभागाचा अजून अधिक प्रभाव दिसून येतो.महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना(MGNREGA) आणि स्वच्छ भारत मिशन यासारख्या योजनांमध्ये लोकसहभागाला प्रोत्साहन देण्यातआले.यामुळे ग्रामीण भागात पायाभूत सुविधांचा विकास झाला आणि लोकांचेजीवन मान उंचावले.

ग्रामविकास आणि लोकसहभाग यांचा इतिहास भारतीय विकास प्रक्रियेत अत्यंत महत्त्वाचा आणि दीर्घकालीन आहे.गांधीजींच्या विचारधारे पासून सुरुवात झालेल्या या प्रक्रियेत,पंचायती राज संस्थांनी लोकसहभागाला नवी दिशा दिली.आजही,लोकसहभागहा ग्रामविकासाच्या यशस्वितेसाठी एक अत्यावश्यक घटक आहे.त्याच्यामुळेच ग्रामीण भागाचा सर्वांगीण विकास साधता येतो आणि लोकांच्या जीवनात वास्तव परिवर्तन घडवता येते.

**कै. बळवंतराय मेहता समितीचा अहवाल (१९५७) :**

के. बळवंतराय मेहता समितीला असे आढळुन आले, की सामूहिक विकास कार्यक्रमातील यंत्रणेला लोकांतील पुढाकार व त्यांचे नेतृत्व जागृत करण्यात फार कमी यश प्राप्त झाले. त्यामुळे समितीला राज्य सरकारच्या खालच्या पातळीवर जबाबदाऱ्यांचे व सत्तेचे विकेंद्रीकरण करण्याची निकडीची गरज दिसून आली. भारताचे राष्ट्रपिता महात्मा गांधी यांनीही ग्रामराज्याच्या स्थापनेचा आग्रह धरला होता. खेडयांना राजकीय स्वायत्ता बहाल करावी आणि खेडी हो स्वयंपूर्ण राजकीय व आर्थिक घटक बनली जावीत, असे त्यांचे प्रतिपादन होते. महात्मा गांधींच्या रामराज्याच्या संकल्पनात स्वायत्त व स्वयंपूर्ण खेडयांना विशेष महत्त्व होते. आपल्या देशात खेडयांना प्राप्त झालेले मध्यवर्ती स्थान विचारात घेवून भारताच्या राष्ट्रीय नेत्यांनीही गांधीजीच्या वरील विचारांचा पाठपुरावा केला होता. महात्मा गांधीचे ग्रामस्वराज्याचे स्वप्न साकारकरण्यासाठी ग्रामीण जनतेला राजकीय सत्तेत भागीदारी देण्याची आवश्यकता आपल्या राज्यकर्त्यांच्या लक्षात आली म्हणूनच या समितीने अशा मूलभूत स्वरूपाची शिफारस केली, की राज्याच्या खालच्या पातळीवरील ज्या संस्थेकडे विकासाच्या कामाची संपूर्ण जबाबदारी जाईल त्या संस्थेकडे राज्य सरकारने सत्ता सुपूर्द केली पाहिजे. समितीने केलेल्या शिफारशीचे स्वरूप थोडक्यात खालीलप्रमाणे आहे.

**अ) जिल्हा परिषद :**

जिल्हा पातळीवर जिल्हा परिषद नावाची परिषद स्थापावी. तिच्याकडे सर्व कामात एकसूत्रता आणण्याचे कार्य सोपवावे. या परिषदेत पंचायत समितीचे अध्यक्ष, लोकसंभा व विधानसभेचे सभासद विकास खात्यातील जिल्हा पातळीवर काम करणारे सर्व अधिकारी सभासद असावेत. जिल्हाधिकारी हा परिषदेचा अध्यक्ष असावा. ही परिषद पंचायत समित्यांचे अंदाजपत्रक मंजूर करील, सरकारकडून आलेल्या पैशाची विकास गटामध्ये विभागणी करील आणि विकास गटातील योजनांमध्ये एकसूत्रता आणील व त्यांना मार्गदर्शन करील.

**ब) पंचायत समिती :**

विकासगटाच्या पातळीवर पंचायत समिती नेमावी, ही समिती ग्रामपंचायतींनी अप्रत्यक्षपणे निवडावी. तिच्या क्षेत्रात काम करणाऱ्या सहकारी संघटना यांना समितीमध्ये प्रतिनिधीत्व द्यावे, पंचायत समितीकडे काही निश्चित कामे सोपवावीत व महसुलापैकी काही बाबीही सोपवाव्यात.

**क) ग्रामपंचायत :**

ग्रामपंचायतीच्या निवडणुका प्रौढ मतदार पध्दतीवर प्रत्यक्ष निवडणुकीद्वारे व्हाव्यात. त्यात दोन स्त्री सभासद तसेच अनुसूचित जाती व जमातीचा प्रत्येकी एक सभासद स्वीकृत करावा. कर चुकविणाऱ्या व्यक्तीस मत देण्याचा अधिकार राहू नये. ग्रामपंचायतीने शासनाच्या मदतीने जमीन महसूल वसूल करावा.

**साहित्याची पडताळणी :**

प्रस्तुत संशोधना विषयी संबंधित तथ्य गोळा करण्यासाठी लागणारे साहित्य, पुस्तके, लेख, वर्तमानपत्रे, इंटरनेट, इत्यादी गोळा केलेल्या तत्यांच्या आधारे साहित्याची पडताळणी केली आहे. ग्रामीण विकासाच्या संकल्पनेचा उदय महात्मा गांधीजींच्या विचारातून झाला आहे.त्यांनी म्हटले होते."ग्रामीण भाग भारताचा आत्मा आहे.जो पर्यंत गावांचा विकास होणार नाही;तोपर्यंतदेशाचा विकास होणारनाही."

ग्रामविकासात लोकसहभाग म्हणजे ग्रामविकासाच्या प्रक्रियेत स्थानिक लोकांचा सक्रिय सहभाग. हा सहभाग ग्रामस्थांच्या गरजा,समस्या आणि संभाव्यता ओळखून त्यांचे निराकरण करण्यासाठी उपयुक्त ठरतो.लोकसहभागामुळे योजना अधिक प्रभावीपणे राबवल्या जातात,कारण स्थानिक लोकांना आपल्या भागातील समस्या आणि संसाधने चांगल्या प्रकारे माहीत असतात.

संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान:मानवी जीवनात स्वच्छतेला फार महत्त्व असते.म्हणून ग्रामीण स्वच्छता मूळ उद्देश ग्रामीण भागातील सामान्य माणसांचेआरोग्य मान उंचावण्याचा आहे. ग्रामीण भागात अशुद्ध पाणी, अस्वच्छ परिसर तसेच सामाजिक ववैयक्तिक स्वच्छते अभावी उद्भवणाऱ्या रोगांमुळे पीडित असलेल्यांची आकडेवारी वाढल्यामुळे हा उद्देश फारसा सफल न झाल्याने त्यांचे आरोग्यमान,विवरणाने जीवनस्तर उंचावण्यासाठी शासन प्रयत्नशील आहे. त्यात ग्रामस्थांचा सक्रियवसातत्य पूर्ण सहभाग कार्यक्रमात करून न घेण्याची प्रभावी तरतूद कार्यक्रमाच्या अंमलबजावणीत असावी,ग्रामीण जनतेस हा कार्यक्रम आपला वाटावा,त्याचे महत्त्वपटून त्यांचा उत्स्फूर्त सहभाग मिळावा यादृष्टिकोनातून सन २०००-२००१ पासून संतगाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान,

Research Hub International Journal

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज स्वच्छग्रामस्पर्धा राबविण्यात येत आहे.संतगाडगेबाबा आणि राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचे स्वच्छते विषयक कामाचे महत्त्व लक्षात घेऊन महाराष्ट्रशासनाने दि.२ऑक्टोबर२००० रोजी संतगाडगेबाब यांच्यानावाने ग्रामस्वच्छता अभियान सुरू केले. त्यामुळे ग्रामीण भागातील खेडी स्वच्छ होऊ लागली आणि जणू एका नवीन युगाला प्रारंभ झाला.

**'मदर ऑफ सीड 'राहीबाई पोपेरे,पोपटराव पवार यांना पद्मश्री :**

**अहमदनगर :** प्रजासत्ताक दिनाच्या पुर्वसंध्येला सरकारकडून पुरस्कारानं गौरविण्यात येणाऱ्या मान्यवरांची यादी जाहीर केली.यात महाराष्ट्रातील तीन कर्तबगार व्यक्तींचा हा प्रतिष्ठेचा पुरस्कार जाहीर झाला आहे.सुरेल गळयांनं गाण्यांमध्येभाव भरणारेगायकसुरेश वाडकर ‘मदरऑफसीड्स ’अशी जगभरात ओळख मिळवणाऱ्या राहीबाई पोपेरेआणिआदर्श गावयोजनेचे प्रणेतेपोपटराव पवार यांचा हीपद्मश्री पुरस्काराने गौरव करण्यात आला. शासकीय अधिकाऱ्यांनी मनापासून काम केलंतर गावांचा विकास होईल:सरपंच भास्कर पेरे पाटील
**मुंबई :** शासकीय अधिकाऱ्यांनी मनापासून काम केलं तर गावांचा विकास व्हायला वेळ लागणार नाही, असे स्पष्ट मत पाटोदागावचे आदर्श सरपंच भास्कर पेरे पाटील यांनी मांडले.गावाचा विकास करण्यासाठी निधीची फार आवशक्यता आहे.त्यामुळे गावातचं निधी उभा करायसा हवा,असे सांगत पाटोदागावच्या अभिनव कर संकलनाचे उदाहरण त्यांनी मांडले.शहरे नक्कीच मोठी व्हावीत,पण प्रत्येक गोष्टीची मर्यादा असते.आजआपण शहरातून बाहेर पडणाऱ्या लोंढ्या वरुन अंदाज लावू शकतोकी शहरांवर किती मोठ्या प्रमाणात ताण आहे. औरंगाबाद जिल्ह्यातील आदर्शगाव पाटोद्याचे सरपंच भास्कर पेरे पाटील आज माझा कट्टाकार्यक्रमात सहभागी झाले होते.यावेळीत्यांनी अनेक विषयांवर आपलं मत मांडलं.

**आदर्श घाटकुळ ला जिल्हा स्तरीय सुंदर गाव पुरस्कार :**

**चंद्रपूर :** महाराष्ट्र ग्राम सामाजिक परिवर्तन अभियानांतर्गत राज्यात आदर्श ग्राम ठरलेल्या पोंभुर्णा तालुक्यातील घाटकुळ ग्रामपंचायतीला आर.आर.पाटील जिल्हासुंदर (स्मार्ट) गाव पुरस्कार जिल्हापरिषदेच्या मा.सा.कन्नमवार सभागृहात प्रदान करण्यातआला.जिल्हा परिषदेचे मुख्यकार्यकारी अधिकारी राहुल कर्डिले, अतिरिक्त मुख्यकार्यकारी अधिकारी श्याम वाखर्डे, उपमुख्यकार्यकारी अधिकारी कपिल कलोडे यांच्या हस्ते घाटकुळच्या माजी सरपंच प्रीती नीलेश मेदाळे, ग्रामसेवक ममताबक्षी ,ग्रामपरिवर्तक अविनाशपोईनकर, स्वेच्छा ग्रहीराम चौधरी,संगणक चालक आकाश देठे,रोजगार सेवक वामन कुद्रपवार, कर्मचारी अनिलहासे, उत्तम देशमुख,महिला ग्रामसंघ अध्यक्ष भाग्यश्री देठे आदींनी हा पुरस्कार स्वीकारला .घाटकुळ हे जिल्ह्यातील पहिले सुंदर गाव ठरले आहे.तालुकास्तरावर २० लाख रुपये व जिल्हास्तरावर ५०लाख रुपये असा एकूण ७० लाखांचा' जिल्हा सुंदरगाव पुरस्कार' आदर्श गाव घाटकुळने पटकावलाआहे.लोकसहभाग व श्रमदानातून गावकऱ्यांनी केलेली कामे,ग्रामपंचायती च्या स्वतंत्र योजना, गावहितासाठी राबविलेले कल्याणकारी उपक्रम व त्यातून घडलेल्या परिवर्तनामुळे घाटकुळ गाव राज्यातआदर्शग्राम,हरित वस्वच्छग्राम, जिल्हास्मार्ट व सुंदर ग्राम ठरले. स्वच्छता, व्यवस्थापन, दायित्व, अपारंपरिक ऊर्जा व पर्यावरण, पारदर्शता या स्मार्ट व सुंदर ग्रामनिकषांवर गावाचा गौरव करण्यात आला. गावा ती शाळा, अंगणवाडी ही' आयएसओ' नामांकित आहे. मेंढा (लेखा) या गावाचे नाव घेतल की, एक चळवळ आपल्या सर्वांच्या लक्षात येते.

"दिल्ली-मुंबईत आमचे सरकार!

आमच्या गावात आम्हीच सरकार!!"

गडचिरोली जिल्ह्यातील भामरागड भागात राहणाऱ्या एका सर्वसामान्य माडीया, गोंड, आदिवासी, माणसाने या घोषणेची प्रेरणा दिली, व त्याच्या प्रेरणेने भागात तेव्हा (१९८८) काम करीत असलेले लोकबिरादरी प्रकल्प, हेमलकसा चे कार्यकर्ते मुकुंद दिक्षीत यांचेकडून मेंढा (लेखा) गावाला ही घोषणा कळली व मेंढा (लेखा) च्या गावकऱ्यांनी ती अंमलात आणली.

गावाच्या संबंधी काही ठरवायचे असेल व निर्णय घ्यायचा असेल तर गावातील सर्व स्त्री पुरुष मिळवून ठरविणार. गावकऱ्यांच्या वतीने निर्णय घेण्याचा अधिकार कोणत्याही प्रतिनिधीला न देता गावकऱ्यांना असणार. म्हणजे 'आमच्या गावात आम्हीच सरकार' पण एकापेक्षा जास्त गावांचा किंवा जिल्हा, राज्य व देशाचा प्रश्न असेल तर त्यासाठी आमच्या प्रतिनिधीला अधिकार देऊ म्हणजेच 'दिल्ली-मुंबईत आमचे सरकार !'

**अध्ययनपद्धती :**

**समस्यासूत्रण :**

निवडण्यात आलेल्या विषयाचे क्षेत्र विशिष्ट संशोधन समस्येत रुपांतरण करणे म्हणजे समस्या सूत्र होय . तसेच संशोधना साठी निवडलेल्या व्यापक विषयाचे एक निश्चित व स्पष्ट विषयात रूपांतर करण्यासाठी समस्या सुत्रण केले आहे.

**विषय :- "लोकसहभाग व ग्रामविकास"**

**विशेषसंदर्भ :"चंद्रपूरजिल्ह्यातील तालुक्यातील चेक निंबाळा गावातील प्रौढ ग्रामस्थांचे अध्ययन"**

**प्रारंभिक प्रश्न :**

1. ग्रामस्थांची वैयक्तिक, कौटुंबिक, शैक्षणिक, आर्थिक व सामाजिक स्थिती कशी असेल?
2. ग्राम विकासाच्या योजना राबवत असताना लोकसहभाग राहत असेल का?
3. ग्राम विकासात लोकसहभाग वाढविण्या करिता कोणत्या समस्या येतअसेल?
4. ग्रामविकासा मध्ये कोणत्या घटकाचा विकास झालाअसेल?

**अध्ययनाचे उद्देश :**

1. ग्रामस्थांची वैयक्तिक,कौटुंबिक,शैक्षणिक,आर्थिक व सामाजिक स्थिती जाणून घेणे.
2. ग्रामविकासाच्या योजना राबवत असताना लोक सहभाग जाणून घेणे.
3. ग्रामविकासामध्ये कोणत्या घटकाला लोकसहभागाचा प्रतिसाद मिळाला याचा शोध घेणे.
4. लोकसहभागा चा ग्राम विकासात योगदान जाणून घेणे.



Research Hub International Journal

**उपकल्पना/गृहीतकृत्य :**

उपकल्पना म्हणजे त्या प्रश्नाला मिळालेले संभाव्य उत्तर होय.

1. ग्रामस्थांची शैक्षणिक, कौटुंबिक, आर्थिक व सामाजिकस्थिती साधारण आहे.
2. लोकसहभाग जितका जास्त तितके ग्रामविकास जास्त.
3. पायाभूत सोयी सुविधा व लोक सहभाग याचा सहसंबंध आहे.

**अध्ययनाचे क्षेत्र :** त्यानुसार चंद्रपूर जिल्ह्यातील चंद्रपूर तालुक्यातील चेकनिंबाळा हे गाव संशोधन क्षेत्र आहे.

**अध्ययनाचे विश्व :** प्रस्तुत संशोधणात चंद्रपूर जिल्ह्यातील तालुक्यातील चेकनिंबाळा यागावातील ग्रामस्थ हे अध्ययना चे विश्वआहे.

**नमुना निवड :**

चंद्रपूर जिल्ह्यातील तालुक्यातील चेकनिंबाळा या गावातील एकूण २५० कुटुंबातील प्रौढ ग्रामस्थ ठरवून संभाव्य नमुना निवड पद्धतीतील नियमित अंकनप्रणाली निवडपद्धतीचा अवलंब करून ६० उत्तरदात्याची निवडकरण्यात आले.

**तथ्य संकलन :**

अध्ययना साठी तथ्य संकलनाचे प्राथमिक व दुय्यम अशा दोन्ही पद्धतींचा अवलंब करण्यात आले.

1. **प्राथमिक स्रोत :** तथ्य संकलनाच्या प्राथमिक स्रोतात मुलाखती करिता अनुसूची तयार करताना प्रत्यक्ष संपर्क साधून संरचित मुलाखत मधून तसेच मुक्त व बंदिस्त प्रश्नांचा समावेश करून संशोधनासाठी तथ्य गोळा करण्यात आले.
2. **दुय्यम स्रोत :** तथ्य संकलना साठी दुय्यम पद्धती मध्ये संशोधनकर्त्यांनी निवडलेल्या विषया संबंधीत पुस्तके, अहवाल, मासिके, लेख, पत्रे, इंटरनेट इत्यादीं चा समावेश करून संशोधनासाठी तथ्य गोळा करण्यात आले.

**तथ्यप्रक्रियन :**

संशोधनकर्ते निश्चित केलेल्या विश्वातून निवडलेल्या नमुन्याच्या आधारावर संचित मुलाखत अनुसूचीच्या माध्यमातून संकलित केलेल्या तथ्याची प्रक्रिया करण्यात येईल.याकरिता खालील पायऱ्यांचा अंतर्भाव करण्यात आले.

**संशोधन आराखडा :**

प्रस्तुत संशोधन आराखड्याचे स्वरूप अंशतःवर्णनात्मक व अंशतःनिदाणात्मक राहील, कारणयात ग्रामस्थांच्या वैक्तिक,कौटुंबिक,सामाजिक,शैक्षणिक आणि आर्थिक स्थितीचे वर्णन करण्यात आले.

**संकल्पना :**

संकल्पना या अमूर्त अनुभवलेल्या घटना, वस्तू आणि प्रसंगाच्या प्रतिकृती म्हणजे संकल्पना होय. संकल्पना स्पष्ट करणे हे महत्वाचे कार्य आहे आपल्याला अनुभवता येते.ते स्पष्ट करण्याची भूमिका म्हणजे संकल्पना होय.

**ग्राम :**

"निसर्गाच्या सानिध्यात लोकवस्ती असलेल्या आणि भारतीय संविधानाच्या अनुच्छेद-२४३-खंड (छ) अन्वये अधिसूचनेने विनिर्दिष्ट केलेल्या विशिष्ट भुभागाला गाव म्हणतात."

**ग्रामविकास :**

**डॉ. व्ही. के. आर. व्ही. राव यांच्या मते,** "ग्रामीण क्षेत्रातील लोकांच्या जीवनमानात सुधारणा करण्यासाठी तेथील नैसर्गिक व मानवी संसाधनांचा पर्याप्त वापर करणे म्हणजे ग्रामीण विकास होय"

**लोकसहभाग :** "लोकसहभाग म्हणजे जनतेचा किंवा नागरिकांचा समाजातील निर्णयप्रक्रियेत प्रत्यक्ष किंवा अप्रत्यरीत्या सहभाग घेणे होय."

**निष्कर्ष :**

**1.** ग्रामस्थांची वैयक्तिक,कौटुंबिक,शैक्षणिक,आर्थिक व सामाजिक स्थिती साधारण आहे.
2. ग्रामस्थ सामाजिक उपक्रमांमध्ये सहभागी होतात.
3. ग्रामविकासाच्या योजना राबवत असताना लोकसहभाग दिसूनयेतो.
4. लोकसहभागाचा ग्रामविकासात योगदान आहे.
5. स्थिर उत्पन्न असलेल्या कुटुंबांचा ग्रामविकास उपक्रमांमध्ये जास्त सहभाग आहे.
6. स्वच्छ भारत अभियान आणि प्राथमिक आरोग्य सेवा उपक्रमांत लोकसहभाग दिसतो.
7. शिक्षण, आरोग्य, स्वच्छता, जलसंधारण, शेती सुधारणा आणि स्वयंरोजगार उपक्रमांमध्ये लोकसहभाग अधिक दिसून येतो.
8. ग्रामविकासा मध्ये रोजगार, स्वच्छता व आरोग्य उपक्रमात ग्रामस्थांचा काहीप्रमाणात सहभाग दिसून येतो.

**उपकल्पनाचा पडताळा :**

1. ग्रामस्थांची शैक्षणिक,कौटुंबिक,आर्थिक व सामाजिक स्थिती साधारण आहे.ही उपकल्पना सत्य ठरली.
2. लोकसहभाग जितका जास्त तितके ग्रामविकास जास्त.हीउपकल्पना सत्य ठरली आहे.
3. पायाभूत सोयी सुविधा व लोकसहभाग याचा सहसंबंधआहे.हीउपकल्पना ठरली आहे.

**सूचना व शिफारशी :**

**लोकसहभाग वाढवण्यासाठी :**

१) **ग्रामसभर :** गावातील प्रत्येक नागरिकाने ग्रामसभेत सक्रिय सहभाग घ्यावा आणि विकास विषयक

चर्चेत आपले मत मांडावे.

२) **जनजागृती मोहिमा :** लोकशाही हक्क, सरकारी योजना, आणि ग्रामविकास प्रक्रियेबाबत लोकांना माहिती देण्यासाठी नियमित जनजागृती अभियान राबवावेत.

३) **स्वयंसेवी संस्था आणि स्थानिक संघटनांचा सहभाग :** सामाजिक संस्था, महिला बचतगट, आणि युवक मंडळ यांना विकास प्रकल्पांत सहभागी करून घ्यावे.

४) **शासनाच्या योजनांचा लाभ :** लोकांनी प्रधानमंत्री ग्रामसडक योजना, जलसंधारण योजना, उज्ज्वला योजना अशा सरकारी उपक्रमांचा फायदा घ्यावा.

५) **ग्रामस्तरीय योजना आणि निधी व्यवस्थापनात पारदर्शकता :** विकास प्रकल्पांसाठी खर्चाचा हिशोब ग्रामसभेत सार्वजनिक करावा.

**ग्रामविकासासाठी :**

**१)** **शाश्वत शेती आणि जलव्यवस्थापन:** शाश्वत शेती तंत्र, ठिबक सिंचन, आणि पावसाच्या पाण्याचे संकलन यासारख्या उपायांचा अवलंब करावा.

२) **स्वच्छता आणि आरोग्य:** गावात कचरा नियंत्रण, स्वच्छ शौचालये आणि आरोग्य शिबिरे आयोजित करून आरोग्य सुधारावे.

३) **स्थानीय रोजगार निर्मिती:** गावातच रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी ग्रामोद्योग, हस्तकला, आणि कृषीपूरक व्यवसाय वाढवावेत.

४) **शिक्षण आणि कौशल्यविकास:** गावातील मुलांना गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळावे आणि युवकांना रोजगारक्षम प्रशिक्षण द्यावे.

**५)** **संगणकीकरण आणि डिजिटल सेवांचा विस्तार:** सरकारी सेवांसाठी गावपातळीवर डिजिटल सेवा केंद्रे (CSC) सुरू करावीत, जेणेकरून शेतकरी आणि स्थानिक नागरिकां त्वरित सुविधा मिळतील.

**संदर्भ ग्रंथ सूची :**


- बोधनकर सुधीर (१९९६) समाजिक संशोधन पद्धती, दत्ताराम प्रकाशन नागपूर.
- गुंजाळविष्णू , पंचायतराज ग्रामीण विकास आणि सरपंच, अथर्व पब्लिकेशन.
- कदम प्रशांत, पंचायतराज – ग्रामीण व नागरी स्थानिक शासन संस्था, टाटा - मॅकग्राहिल
- पाटील शैलेश, वर्ष २०२२–२०२३, ग्रामविकास व लोक सहभाग
- सुदर्शन (२००८) ग्राम पंचायत प्रशासन, श्री मुंजे प्रमोद विद्याप्रकाशन रुईकर रोड महाल नागपूर.
- शिरसाठ श्याम पंचायती राज आणि नागरी प्रशासन, विद्या बुक्स पब्लिशर्स औरंगपुरा, औरंगाबाद.